वर्ष - 7 । अंक - 233 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

WELCOME 2024

**नुतन वर्षाभिनंदन**

नवीन वर्ष आपणास सुख, समाधानाचे,
आनंदाचे, ऐश्वर्याचे आरोग्याचे जावो,
नवीन वर्षात सर्वांचे जीवन सुखमय होवो,
याच 2024 या नवीन वर्षाच्या शुभेच्छा!
- महाईन्यूज परिवार

www.mahaenews.com । सोमवार, दिनांक 1 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 32 दिवस 38 हजार 65 लाभार्थी!

## विकसित भारत संकल्प यात्रेची उपलब्धी : पिंपरी-चिंचवड भाजपाची मोठे यश



। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या पुढाकाराने सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांना मिळावा. या करिता "विकसित भारत संकल्प यात्रा" हा उपक्रम देशपातळीवर हाती घेण्यात आला. हा संकल्प रथाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमध्ये ३२ दिवसांत तब्बल ३८ हजार ६५ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची उपलब्ध शहर भाजपाने हासील केली आहे.**

"विकसित भारत संकल्प यात्रा" दि. २८ नोव्हेंबर रोजी दाखल झाली. त्याचा शुभारंभ प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह या ठिकाणी झाला होता. जुनी सांगवी येथील गजानन महाराज मंदिर येथे त्याचा समारोप दि. ३० डिसेंबर रोजी झाला. यावेळी आमदार उमा खापरे, भाजपा पंचायत राज आणि ग्रामविकास प्रदेश उपाध्यक्ष समाधान गायकवाड, माजी महापौर माई ढोरे , माजी नगरसेवक विभीषण चौधरी, भाजपा पंचायत राज आणि ग्रामविकास जिल्हाध्यक्ष अभिजित प्रकाश बोरसे, संतोष कांबळे, माजी नगरसेविका शारदा सोनावणे , भाजप शहर उपाध्यक्ष जवाहर सोनावणे, शहर सरचिटणीस संजय मंगोडेकर यांच्या उपस्थित झाला. यावेळी ३० दिवस या अभियामध्ये विशेष काम केलेले अधिकारी मनोज लोणकर आणि महानगपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. भाजपाच्या केंद्रीय स्तरावरून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाला पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या प्रमाणात लाभार्थींचा प्रतिसाद मिळाला. ३२ दिवसात ६५ ठिकाणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ही यात्रा गेली. विकसित भारत संकल्प यात्रेला लाभार्थी म्हणून भेट दिलेले नागरिकांची संख्या ३८ हजार ६५ इतकी नोंद झाली आहे. यामध्ये आधार कार्ड सेवा - २५६७, आरोग्य शिबीराचा लाभ घेतलेले नागरिक- ९४०६, प्रधानमंत्री उज्वला योजना - २४८७, आयुष्यमान भारत - ५८२३, आभा कार्ड - ४५२३, प्रधानमंत्री स्वनिधी योजना - ३३७९, भारताला विकसित राष्ट्र बनविण्याची शपथ घेतलेले नागरिक -१०४१५, मेरी कहानी, मेरी जुबानी - १५२ अशी नोंद झाली आहे.

### शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा निर्णायक पुढाकार...

सुरूवातील शहरामध्ये एका दिवशी-दोन ठिकाणी हे अभियान राबवण्यात येत होते. २८ नोव्हेंबर पासून ७ डिसेम्बर २०२३ पर्यंत एका ठिकाणी सकाळी १०.०० ते १.०० या वेळेत व दुसऱ्या स्थळी दुपारी २ ते ६.०० वाजेपर्यंत अभियान राबवले जात होते. दि. ८ डिसेंबर रोजी प्रंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लाईव्ह कार्यक्रम झाला. त्यानंतर भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी महानगपालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रत्येक ठिकाणी ही शिबिराची वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत वाढविण्यास सांगितली आणि त्यामुळे जास्तीत-जास्त नागरिकांना विकसित भारत संकल्प यात्रेचा लाभ झाला, अशी माहिती अभिजित बोरसे यांनी दिली.



"शेवटच्या घटकाचा विकास" हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे ब्रिदवाक्य आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी "विकसित भारत संकल्प यात्रा" पिंपरी-चिंचवडमध्ये यशस्वीपणे राबवण्यात आली. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली शहरात शतप्रतिशत लाभार्थी निश्चित करण्याचा आमचा संकल्प आहे.

-शंकर जगताप,
**शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



### भाजपा पदाधिकाऱ्यांचे योगदान...

आमदार उमा खापरे यांच्या उद्बोधनामुळे शहर भाजपाची महिलाशक्ती सुद्धा मोठ्या उत्साहाने या अभियानामध्ये उतरली. सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर यांनी यात्रा सुरु झाल्याबरोबर शहरातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा यशस्वी करण्याकरिता शहर कार्यकर्त्यांना आवाहन केले. जास्तीत-जास्त नागरिकापर्यंत लाभ पोचविण्याकरिता या यात्रेचे संयोजक, भाजप पंचायत राज विभागाचे जिल्हा संयोजक अभिजित बोरसे आणि माजी नगरसेववक विभीषण चौधरी यांनी विशेष प्रयन्त केले आहेत. तसेच, भारतीय जनता पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते, विशेषतः भाजप पंचायत राज विभागाचे पिंपरी विधानसभा संयोजक मनोज शिंदे, जिल्हा सहसंयोजक अखिलेश भालेकर, शुभम कातंगळे , रोहन चव्हाण, मधुराताई खाडिलकर , सौ संगीता बालाजी चव्हाण यांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण महिनाभर प्रयत्न केले आहेत.

# अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

## » 50 रुग्णवाहिका, 90 तज्ज्ञ डॉक्टर आणि 200 आरोग्य कर्मचारी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पेरणे फाटा येथे 1 जानेवारी रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन (BHIMA KOREGAON) सोहळ्यासाठी प्रशासनाने आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली असून येणाऱ्या अनुयायांसाठी तयार करण्यात आलेल्या सुविधांचा जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी परिसराला भेट देऊन आढावा घेतला. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी शिक्रापूर येथील वाहनतळ आणि विजयस्तंभ परिसराची पाहणी केली.**

स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशा सुविधा राहील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना माहिती देण्यासाठी सूचना फलक ठिकठिकाणी लावावेत. गर्दीचे नियोजन योग्य पद्धतीने होण्यासाठी पीएमपीएमल बसेसच्या फेऱ्या सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी दिल्या. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यावर्षी अधिक अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेवून अधिक प्रमाणात सुविधा करण्यात आल्या आहेत. 29 ठिकाणी आरोग्य कक्ष उभारण्यात आले आहे. 20 फिरते दूचाकी आरोग्य पथक, 50 रुग्णवाहिका 90 तज्ज्ञ डॉक्टर आणि 200 आरोग्य कर्मचारी नियुक्त केलेले आहे. खाजगी रुग्णालयात 100 खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. पुरेशा प्रमाणात औषधसाठादेखील ठेवण्यात आला आहे. स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरिता दीडशे पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या माता-भगिनींची काळजी घेण्यात आली असून एकूण पाच हिरकणी कक्ष उभारण्यात येत आहेत. हिरकणी कक्षामध्ये स्तनदा माता व ज्येष्ठ महिला यांना तसेच त्यांच्या समवेत



असलेले लहान बालकांसाठी विश्रांती तसेच बालकांच्या मनोरंजनाकरीता खेळणी साहित्य व खाऊ ठेवण्यात आला आहे. या ठिकाणी स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. परिसरातील विविध ठिकाणी एकूण 2 हजार 200 तात्पुरत्या शौचालयांची उभारणी करण्यात आलेली आहे. वापराच्या पाण्यासाठी 40 टँकर आणि स्वच्छतेसाठी 40 सक्शनमशीन व 15 जेटींग मशीन ठेवण्यात आले आहेत. रस्त्यावर कचरा साचू नये याकरीता 500कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. स्वच्छतेसाठी 200सफाई कामागार नियुक्त करण्यात आले आहेत. कचरा उचलण्याकरिता 80 घंटागाड्या उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पोलिसांकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून नागरिकांना सुचना देण्यासाठी ठिकठिकाणी ध्वनीक्षेपकांची व्यवस्था ( पब्लीक अ‍ॅड्रेस सिस्टिम) करण्यात आली आहे. सीसीटीव्हीद्वारे परिसरावर नजर राहणार असून त्यासाठी सुसज्ज नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथाच्या शताब्दी वर्षानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून विजयस्तंभ परिसरात बार्टी संस्थेच्यावतीने पुस्तकांचे 300 स्टॉल उभारले आहेत. बार्टी संस्थेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जीवनावरील मौल्यवान पुस्तके 85 टक्के सवलतीच्या दरात अनुयायांना वितरण करण्यात येणार आहेत.'द प्रॉब्लेम ऑफ रुपी, भारताचे संविधान, संविधान उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, बुद्ध आणि त्याचा धम्म आदी पुस्तके उपलब्ध असून अनुयायांनी बार्टीच्या दालनाला भेट देऊन या पुस्तकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी केले आहे. सोहळ्यास उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांना घरबसल्या सोहळा पाहता यावा यासाठी सह्याद्री वाहिनीवरून 1 जानेवारी रोजी सकाळी 6 ते दुपारी 12 वाजेपर्यंत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. सकाळी 6:30 वाजता मान्यवर पाहुणे विजयस्तंभास अभिवादन करतील.

### पुरेशा प्रमाणात औषधसाठा

» 7:30 वाजता समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. सकाळी 9:30 वाजता 'डॉ.बी.आर. आंबेडकर विज्डम बुकफेअर'चे उद्घाटन होईल, अशी माहिती बार्टीच्यावतीने देण्यात आली आहे.स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशा सुविधा राहील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना माहिती देण्यासाठी सूचना फलक ठिकठिकाणी लावावेत. गर्दीचे नियोजन योग्य पद्धतीने होण्यासाठी पीएमपीएमल बसेसच्या फेऱ्या सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी दिल्या. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यावर्षी अधिक अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेवून अधिक प्रमाणात सुविधा करण्यात आल्या आहेत. 29 ठिकाणी आरोग्य कक्ष उभारण्यात आले आहे. 20 फिरते दूचाकी आरोग्य पथक, 50 रुग्णवाहिका 90 तज्ज्ञ डॉक्टर आणि 200 आरोग्य कर्मचारी नियुक्त केलेले आहे. खाजगी रुग्णालयात 100 खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. पुरेशा प्रमाणात औषधसाठादेखील ठेवण्यात आला आहे.

# प्रकाश आंबेडकर आणि शरद पवार यांची भेट?

## » पुण्यातील मोदी बागेत भेट झाल्याने चर्चेला उधाण

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर (PRAKASH AMBEDKAR) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (SHARAD PAWAR) यांच्यात भेट झाली असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. प्रकाश आंबेडकर हे शनिवारी रात्री पुण्यातील शरद पवार राहत असलेल्या मोदी बाग या सोसायटीत आल्याने राजकिय निरीक्षकांच्या भुवया ऊंचावल्या आहेत. तर, प्रकाश आंबेडकर यांनी पवारांसोबत भेट झाल्याचे वृत्त फेटाळून लावले आहे.**

मागील काही दिवसांपासून विरोधकांच्या इंडिया आघाडीत येण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीकडून जोर दिला जात आहे. तर, वंचितच्या समावेशाबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीत आपण चर्चा केली असल्याचे शरद पवार यांनी म्हणत, वंचितबाबत सकारात्मकता दाखवली. त्यानंतर प्रकाश आंबेडकर आणि शरद पवार यांच्यात भेट झाल्याच्या वृत्ताने चर्चांना उधाण आले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे शनिवारी रात्री पुण्यातील शरद पवार रहात असलेल्या मोदी बाग या सोसायटीत आले. मात्र, प्रकाश आंबेडकरांनी मोदी बाग या सोसायटीत राहणाऱ्या आपल्या बहिणीला भेटण्यासाठी आपण





आल्याच स्पष्ट केलं. या दरम्यान शरद पवारांची आणि आपली भेट झाल्याचा त्यांनी इन्कार केला आहे. प्रकाश आंबेडकर हे इंडीया आघाडीत जाण्यास इच्छुक असून शरद पवारांनी देखील त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. काही दिवसांपूर्वी या दोन नेत्यांची मुंबईत भेट झाली होती. नरेंद्र मोदी यांना सत्तेतून हटवणे हा आमचा मुख्य अजेंडा आहे असं सांगत वंचित बहुजन आघाडीने (Vanchit Bahujan Aghadi) महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला. महाराष्ट्रातील विरोधी पक्षाने प्रत्येकी 12 जागांवर निवडणूक लढवावी असं वंचितकडून आवाहन करण्यात आलं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी या चार पक्षांमध्ये लोकसभेच्या 48 जागांची समान विभागणी करावी. प्रत्येकी 12 जागा घेऊन सर्व पक्षांनी एकत्रित मोदींचा पराभव करावा असा आमचा फॉर्म्युला असल्याचे वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी औरंगाबाद येथे वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारणीची बैठक पार पडल्यानंतर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.

### आघाडीच्या बैठकीत चर्चा

» प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीकडून जोर दिला जात आहे. तर, वंचितच्या समावेशाबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीत आपण चर्चा केली असल्याचे शरद पवार यांनी म्हणत, वंचितबाबत सकारात्मकता दाखवली. त्यानंतर प्रकाश आंबेडकर आणि शरद पवार यांच्यात भेट झाल्याच्या वृत्ताने चर्चांना उधाण आले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे शनिवारी रात्री पुण्यातील शरद पवार रहात असलेल्या मोदी बाग या सोसायटीत आले.

# करदात्यांसाठी नववर्षाचे 'गिफ्ट'!

## » मालमत्ता असेसमेंट रजिस्टर ऑनलाईन : कर संकलन विभागाचा पुढाकार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने गेल्या दोन वर्षात मालमत्ता धारकांना घर बसल्या उच्च दर्जाच्या सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहे. याच अनुषंगाने आता विभागाने मालमत्ता धारकांना नवीन वर्षानिमित्त डबल गिफ्ट दिले आहे. 1 जानेवारीपासून असेसमेंट रजिस्टर ऑनलाईन करण्यात आले आहे. यापुढे एक जानेवारीपासून होणाऱ्या सर्व नोंदी फक्त ऑनलाईन होतील. एक जानेवारीपासून मिळकत कर उतारा ऑनलाईन काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सध्या 6 लाख 15 हजार विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांना कर आकारणी व करसंकलन विभागामार्फत कराची आकारणी व वसूलीची कार्यवाही करण्यात येते. यासाठी 17 विभागीय करसंकलन कार्यालये कार्यरत आहेत.

मालमत्ता धारकांना विविध शासकीय कामांसाठी मालमत्ता कर उतारा लागतो. हा उतारा काढण्यासाठी यापूर्वी नागरिकांना प्रत्यक्ष कर संकलन कार्यालयात जावे लागायचे. त्यानंतर मालमत्ता आकारणी पुस्तकात उतारे शोधावे लागत होते. त्यानंतर हा उतारा हस्तलिखित स्वरूपात दिला जात होता. यासाठी विलंब लागत होता. आता 1 जानेवारीपासून सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. 1 जानेवारीनंतर ज्यांची ऑनलाईन नोंदणी होणार आहेत त्यांना तो उतारा तत्काळ मिळेल. यासाठी नाममात्र असे 20 रूपये शुल्क भरावे लागणार आहे. 31 डिसेंबर 2023 पूर्वीच्या नोंदी नोंद वहीमध्ये नोंदविलेल्या असल्यामुळे संबंधित मालमत्ता धारकांना मालमत्ता उतारा या टॅबवर क्लिक केले की त्याचा तपशील संबंधित झोन कार्यालयाकडे वर्ग केला जाईल. त्यानंतर संबंधित गट लिपीक असेसमेंट रजिस्टरमधील त्या मालमत्तेच्या नोंदी कॉम्प्युटरमध्ये फिड करतील. त्यानंतर संबंधित मालमत्ता धारकांच्या ई-मेल आणि मोबाईलवर लिंक पाठविण्यात येईल. या लिंकवर क्लिक केले की दाखला मिळेल. अथवा महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन दाखला मिळेल. त्यामुळे 1 जानेवारीपासून ऑफलाईन सुविधा बंद करण्यात येणार आहे.

### मिळकत कर उतारा मिळवण्याची... अशी प्रक्रिया

» महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन कर आकारणी व कर संकलन विभागाचा पर्याय निवडावा. यामध्ये मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाकला की त्यामध्ये वेगवेगळे पर्याय दिसतील. मालमत्ता कर उतारा हा पर्याय निवडावा. त्यानंतर फक्त क्लिक करा आणि मालमत्ता कर उतारा मिळवा. ही प्रक्रिया ओटीपी आधारित असल्याने नागरिकांना त्यांच्या मालमत्तेला आपला मोबाईल क्रमांक लिंक करावा लागणार आहे. आतापर्यंत जवळपास साडे चार लाख मालमत्तांना मोबाईल नंबर लिंक केलेले आहेत. उर्वरित मालमत्ता धारक यांनीही आपले मोबाईल नंबर आपल्या मालमत्तेला लिंक करण्याचे पालिकेने आवाहन केले आहे.

" माननीय आयुक्त शेखर सिंह यांचे व्हिजन आणि माननीय अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग हायटेक करण्याचे काम वेगाने चालू आहे. विभाग आधुनिक करत असताना त्याचा अंतिम फायदा मालमत्ता धारकांना होणे, त्यांची कामे सुलभ आणि जलद गतीने होणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आमच्या कुठल्याही उपक्रमाचा केंद्रबिंदू हा अंतिमतः शहरातील नागरिक राहील याची आम्ही दक्षता घेत आहोत.

**-नीलेश देशमुख, सहायक आयुक्त**

" याच महिन्यात आम्ही पालिकेच्या कर संकलन विभाग आणि दुय्यम निबंधक कार्यालये यांच्या डेटाबेसचे इंटेग्रेशन करणार आहोत. त्यामुळे खरेदी खत, बक्षिसपत्र, इच्छापत्र याद्वारे मालमत्तांचे होणारे हस्तांतरण करण्यासाठी मालमत्ता धारकांना आता अर्ज करण्याची गरजही राहणार नाही. मालमत्तेच्या नावात तत्काळ बदल होणार आहे. दुसऱ्या बाजूला आम्ही एका वर्षात जुन्या सर्व अभिलेख जसे की असेसमेंट रजिस्टर, मालमत्तेची मूळ फाईल्स या सर्वांचे स्कॅनिंग आणि डीजिटायझेशन करणार आहोत आणि हे सर्व अभिलेख संबंधित मालमत्तेला जोडले जातील. त्यामुळे संबंधित मालमत्ता धारकाला त्याचे सर्व अभिलेख घर बसल्या एका क्लिकवर उपलब्ध होतील. पारदर्शी, गतिमान आणि जबाबदार प्रशासनाचा हा सर्वात महत्त्वाचा टप्पा असेल. याची अंमलबजावणी करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही बहुधा देशातील पहिली महापालिका ठरेल.

**-शेखर सिंह, आयुक्त**

" शहरात सध्या महापालिका आपल्या दारी अंतर्गत सर्वेक्षण मालमत्ता नोंदणी अभियान चालू आहे. मालमत्तांना लक्षात राहणारे सोपे आणि क्रमनिहाय मालमत्ता क्रमांक देणे, घरभेटी देऊन नोंदीसाठी आवश्यक अंतर्गत मोजणी करणे, मालमत्तेचे आराखडे जागीच उपलब्ध करून देणे अशी कामे करण्यात येत आहेत. या सगळ्यामुळे कर आकारणी व कर संकलन कामकाजात सुसूत्रता आणि सुलभता येणार आहे. सध्या मालमत्ता कर विभाग आणि पाणीपट्टी यांचे इंटेग्रेशन निविदा स्तरावर आहे. त्यामुळे नागरिकांना घरपट्टी आणि पाणीपट्टी वेगवेगळी भरण्याचा त्रास पण वाचणार आहे. पालिकेचा बांधकाम परवाना विभाग आणि मालमत्ता कर विभाग यांचे पण इंटेग्रेशन अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला की लगेचच कर आकारणी होणार आहे. त्यासाठी नागरिकांना आता वेगळे अर्ज, कार्यवाही करण्याची गरज राहणार नाही.

**-प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त**

---

# विविध धार्मिक कार्यक्रमांनी संजीवन समाधी सोहळा!

## » सामूहिक अथर्वशीर्ष पठण : हजारो भाविकांचा सहभाग

। पिंपरी ।महाईन्यूज ।

श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी महोत्सवाच्या 462 व्या वर्षाच्या दुसऱ्या म्हणजेच संकष्ट चतुर्थीच्या दिवशी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये हजारो भाविकांनी व नागरिकांनी सहभाग घेतला.

चिंचवड येथील महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर व श्रीमंगलमूर्ती वाडा येथे, 29 डिसेंबर 2023 ते 2 जानेवारी 2024 या कालावधीत श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी 6 वाजता नितीन दैठणकर यांच्या सनई वादनाने झाली. या कार्यक्रमाला जेष्ठ भाविकांची संख्या उल्लेखनीय होती. त्यानंतर सोहम् योग साधना वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदवत योग प्राणायाम केले. संस्कृती संवर्धन विकास महासंघ व पिंपरी चिंचवड येथील स्थानिक शाळेतील विद्यार्थ्यांनी व सुमारे 450 भाविकांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठणात भाग घेतला. अथर्वशीर्ष पठणाने परिसरात चैतन्य संचारले. यानंतर माजी नगरसदस्या अश्विनी चिंचवडे संचलित सामूहिक अभिषेक घेण्यात आले, याचा सुमारे 150 भाविकांनी लाभ घेतला. तसेच वेदमूर्ती चंद्रशेखर रवडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री लक्ष्मी विनायक याग संपन्न झाला.



### नारदीय कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध...

» लक्ष्मीप्रसाद शंकरराव कुलकर्णी यांच्या नारदीय कीर्तनाने सायंकाळच्या सत्राची सुरुवात झाली. कीर्तनात भाविक रमून गेल्याचे चित्र पाहायला मिळाले. यानंतर प्रिया जोग यांनी समस्त सृष्टीचे चालक भगवान श्री महाविष्णू यांचे श्री विष्णू सहस्त्रनाम या विषयावर प्रवचन व श्री विष्णू सहस्त्रनामाचे पठण केले. सहस्त्रनाम पठण कार्यक्रमाला भाविकांची मोठी गर्दी झाली.

# न्याय यात्रेतील ‘न्याया’ची बाजू



भूमिका

**भाजपसाठी राम मंदिराचा विषय वातावरण निर्मितीचा एक भाग आहे, भाजपचे लोकसभा निवडणुकीतील खरे लक्ष्य महिला, दलित-आदिवासी, ओबीसी आणि नवे मतदार आहेत. त्यामुळे काँग्रेस ‘न्याय यात्रे’त कोणते मुद्दे मांडणार?**

राम मंदिराचा इव्हेंट करून भाजपने काँग्रेस आणि ‘इंडिया’ महाआघाडीची कोंडी केली असे म्हणता येईल. राम मंदिराच्या उद्घाटनाला जावे तर भाजपने फेकलेल्या जाळ्यात आपोआप अडकणार. नाही गेले तर, भाजपला ‘इंडिया’वाले हिंदूविरोधी असल्याचा आरोप करण्याची संधी मिळेल. काही केले तरी भाजपच्या हाती कोलीत मिळणार. डाव्या पक्षांच्या वैचारिक भूमिकेत राम बसत नाही, त्यामुळे त्यांनी राम मंदिरावरून भाजपवर हल्लाबोल केला किंवा राम मंदिराच्या उद्घाटनाला आम्ही जाणार नाही, अशी भूमिका घेतली तरी बिघडत नाही. इतरांनी नेमकी काय भूमिका घ्यावी, हे ‘इंडिया’तील बहुतांश पक्षांचे अवघड जागेचे दुखणे झाले आहे.\ अयोध्येतील राम मंदिर उभारण्याची सगळी मोहीम राजकीय होती; कारण लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली रथयात्रा काढली गेल्यानेच ती मोहीम सुरू झाली. संघ परिवारातील विश्व हिंदू परिषद वगैरे संघटना त्यांच्या परीने राम मंदिराचा मुद्दा उपस्थित करत होते; पण त्याला चालना दिली ती



अडवाणींच्या रथयात्रेनेच. अडवाणी हे राजकीय नेते आहेत. त्यांचा उद्देश फक्त राम मंदिर बनवणे हा कधीच नव्हता. त्यांना भाजपचे हित साधायचे होते, भाजपला केंद्रात सत्ता मिळवून द्यायची होती. त्यासाठी विहिंप आदी संघटनांच्या राम मंदिराचा मुद्दा भाजपने हाती घेतला. त्यातून राम मंदिराचा मुद्दा भाजपने राजकीय केला. मग हिंदूत्वाचा मुद्दा लोकसभा निवडणुकांमध्ये प्रचारात आणला, त्यांच्या वचननाम्यात राम मंदिराचा समावेश केला गेला. हा सगळा भाजपच्या राजकीय हितसंबंधांचा भाग झाला. पण केंद्रात राजीव गांधींचे सरकार असताना रामलल्लाचे दरवाजे उघडले गेले. नरसिंह राव यांच्या काळात बाबरी मशीद पाडली गेली, नरसिंह राव यांना हिंदूत्वावाद्यांचा रेटा रोखता आला नाही. अडवाणींच्या रथयात्रेला बिहारमध्ये अडवण्याचे धाडस फक्त तत्कालीन मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी दाखवले होते. त्यामुळे आत्ताही राम मंदिराच्या उद्घाटनाला लालूप्रसाद यादव व त्यांच्या राष्ट्रीय जनता दलाने विरोध केला तर योग्यच म्हटले पाहिजे. काँग्रेसला मात्र राम मंदिराबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी लागणार आहे. राम मंदिराच्या उद्घाटनाला मल्लिकार्जुन खरगे व सोनिया गांधी जाणार असतील तर त्यामागील कारण पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि पक्षाच्या निष्ठावान १९-२१ टक्के मतदारांना समजावून सांगावे लागेल. राम मंदिराच्या उद्घाटनाला काँग्रेसचे नेते उपस्थित राहणार नसतील तरीही स्पष्टीकरण दिले गेले पाहिजे. त्यासाठी राहुल गांधींची ‘भारत न्याय यात्रा’ योग्य व्यासपीठ ठरेल! या यात्रेची सुरुवात मणिपूरमधून होणार असून तिथे राम मंदिर हा मुद्दा नाही, तिथे दोन जमातींमध्ये सलोखा निर्माण करण्याला प्राधान्य द्यावे लागेल. सुमारे सहा महिने मणिपूरमध्ये हिंसाचार होत असताना तिथल्या भाजप सरकारला एकमेकांवर होणारे अत्याचार थांबवता आले नाहीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा प्रश्न केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य सरकार या दोघांवर सोडून दिलेला आहे. राज्यांतर्गत प्रश्न पंतप्रधानांपर्यंत कशाला आणता असेच मोदींचे म्हणणे असेल तर ते मणिपूरला कशाला जातील? इथे काँग्रेस आणि ‘इंडिया’तील घटक पक्ष जाऊ शकतात. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांना ‘भारत न्याय यात्रे’तून लोकसभा निवडणुकीतील ‘इंडिया’चा अजेंडा पुढे नेता येऊ शकतो. दक्षिणेतही राम मंदिराचा मुद्दा महत्त्वाचा नाही, ना तो पूर्वेकडील राज्यांमध्ये असेल. पश्चिम बंगालमध्ये रामाचा मुद्दा चालला असता तर गेल्या वेळी भाजपने तृणमूल काँग्रेसला पराभूत करून सत्ता मिळवली असती!‘भारत न्याय यात्रा’ ही मणिपूर, नागालँड, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओदिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांतून प्रवास करेल. त्यापैकी हिंदीभाषक राज्यांमध्ये राम मंदिराचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो. पण, इथे राहुल गांधींनी रामावर बोलणे अपेक्षित नाही. हिंदी पट्ट्यामध्ये भाजपच्या रामाच्या मुद्द्याला बळ देणारी कुठलीही कृती काँग्रेसचे नुकसान करेल.

## संपादकीय »

# पुतिन-पंथीय की..?

***माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही.***

माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास १९७९ ते १९८९ या दशकाचे देता येईल. सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्यापासून सुरू झालेला या दशकाचा प्रवास, इराण-इराक युद्ध, बर्लिन भिंतीचे कोसळणे, सोव्हिएत रशियाचे विघटन इत्यादी अनेक महत्त्वाच्या भोज्यांस स्पर्श करून इंटरनेटच्या मायानगरीच्या जन्मापर्यंत येऊन थांबतो. आपल्याकडेही मुंबईतील गिरणी संप, इंदिरा गांधी यांची हत्या आदी अनेक कारणांनी हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. अशा संस्मरणीय वर्षांच्या मालिकेत आजपासून सुरू होत असलेले २०२४ साल आपल्या आगळ्या विक्रमाने स्थान मिळवू शकेल.

**मुंबईतील २६ नोव्हेंबर २००८ रोजीच्या नृशंस दहशतवादी हल्ल्यांचा सूत्रधार हाफिझ सईद याच्या प्रत्यार्पणासाठी रीतसर विनंती भारताने पाकिस्तानकयासंबंधीचे अधिकृत टिपण काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानच्या हंगामी सरकारला सादर केल्याचे बागची म्हणतात.**

# हाफिझचे प्रत्यार्पण कोण करणार?

याविषयी पाकिस्तानी माध्यमांनी बातम्या प्रसृत केल्यानंतर परराष्ट्र खात्याने खुलासावजा माहिती दिली. गेल्या काही महिन्यांत अशा घटनाक्रमांचा प्रघात पडलेला दिसून येतो. निज्जर-कॅनडा, पन्नू-अमेरिका, कतारस्थित माजी भारतीय नौदल अधिकाऱ्यांना झालेली शिक्षा असे काही दाखले देता येतील. यातील समान सूत्र हे, की बाहेरील देशांची माध्यमे, सरकारे काही माहिती भारताविषयी देतात आणि नंतरच आपण तिला दुजोरा देतो. या गोपनीयतेमागील कारण अनाकलनीय आहे. बरे, अशी माहिती ज्या घडामोडींविषयी असते, त्या भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असतात. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली निडर, समर्थ, आत्मविश्वासपूर्ण बनलेल्या, ‘ग्लोबल साउथ’चे नेतृत्व करणाऱ्या भारताला अशा प्रकारे माहितीची दडवादडवी शोभत नाही. हाफिझ सईदच्या प्रत्यार्पण विनंतीची वेळदेखील अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. पाकिस्तानात



सध्या हंगामी सरकार आहे. रोजचा राज्यशकट चालवण्यापलीकडे या सरकारकडे काडीचेही अधिकार नाहीत. अधिकार असलेल्या सुस्थिर सरकारने भारताला प्रतिसाद दिला असता असे नव्हे. परंतु काही महिन्यांपूर्वी तेथे आघाडी सरकार असताना किंवा पुढील वर्षी मार्च महिन्यात नवीन सरकार सत्तारूढ झाल्यानंतर पाठवलेल्या विनंतीला काहीएक वजन आणि अर्थ प्राप्त झाला असता. हाफिझ सईदला सोपवण्यासंबंधी विनंती भारताने पाकिस्तानकडे यापूर्वीही केलेली आहे. २६/११ हल्ल्याशिवाय इतरही हल्ल्यांमध्ये हाफिझच्या लष्कर-ए-तैय्यबा व जमात-उद-दावा या संघटनांचा हात होता. नवीन सहस्रकाच्या सुरुवातीपर्यंत हाफिझच्या कारवाया बेलगाम सुरू होत्या. पण अमेरिकेवर दहशतवादी हल्ले झाल्यानंतर त्या देशाने अफगाणिस्तान-पाकिस्तानमधील दहशतवाद्यांबाबत सहनशून्य धोरण अवलंबले. त्या दबावामुळे का होईना, पाकिस्तानात दहशतवाद्यांचा सुळसुळाट कमी झाला. बरेचसे म्होरके मारले गेले. काश्मीर खोऱ्यात मांडलेला उच्छादही बराचसा कमी झाला. पण यापलीकडे या जिहादींना वेसण घालण्याचे कोणतेही प्रयत्न पाकिस्तानकडून झालेच नाहीत. त्यामुळे एका मर्यादेपलीकडे हे जिहादी म्होरके शिरजोर झाले नाहीत; तरी उजळ माथ्याने वावरत मात्र राहिले. यातही फरक पडला, तो गेल्या दशकाच्या उत्तरार्धात. ‘फायनॅन्शियल ॲक्शन टास्क फोर्स’ (एफएटीएफ) या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या दबावामुळे नोव्हेंबर २०२०मध्ये हाफिझ दहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा पाकिस्तानातील एका न्यायालयाने ठोठावली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पाणबुडी प्रकल्प गुजरातला जाणार?

## विरोधी पक्षांनी राज्य सरकारवर टीका करण्यास सुरुवात

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र सरकारने २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्रातील विविध भागाच्या पर्यटन विकासासाठी १ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणार असल्याची घोषणा केली होती. यांतर्गत सिंधुदुर्गात देशातील पहिली पाणबुडी उपलब्ध करून देण्यात येणार होती. सिंधुदुर्गातील वेंगुर्ले तालुक्यातील निवती रॉक येथे समुद्रविश्व पाहण्यासाठी हा प्रकल्प राज्य सरकार राबवणार होतं.**

परंतु, हा प्रकल्प आता गुजरातच्या द्वारका येथे होणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. टाईम्स ऑफ इंडियाने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं होतं. हा प्रकल्प गुजरातला नेण्यासाठी गुजरात सरकारने माझगाव डॉक लिमिटेडशी करार केल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आणखी एक महत्वाकांक्षी प्रकल्प गुजरातला गेल्याची चर्चा सुरू झाली आहे. यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कोणीही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका. माझ्याबरोबर इथे दीपक केसरकर आहेत. मी सकाळी मंत्री उदय सामंत यांच्याशीदेखील चर्चा केली आहे. हा प्रकल्प आपल्या राज्याचा आहे, जो आपल्या राज्यातून बाहेर जाणार नाही, याची तुम्ही खात्री बाळगा. यासह आपल्या राज्यात इतरही मोठे प्रकल्प सुरू होत आहेत. एमटीएचएल प्रकल्पाचं येत्या १२ जानेवारीला उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या २२ किलोमीटर लांबीच्या सिंगल लॉंगेस्ट ब्रीजचं (सर्वात लांब पूल) उद्घाटन होणार आहे. त्यामुळे २ तासांचं अंतर १५ मिनिटांवर येणार आहे. यासह वेळेची आणि इंधनाची बचत होईल. प्रदूषणही कमी होईल. हा एक गेमचेंजर प्रकल्प असेल. या प्रकल्पामुळे नवी मुंबईजवळ महामुंबई तयार होईल. तिकडे मोठ्या प्रमाणावर विकास होईल. आपल्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. दरम्यान, महाराष्ट्रातला प्रकल्प गुजरातला जाणार असल्याच्या चर्चांबाबत विचारल्यावर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरेंवर याचं खापर फोडलं आहे. दीपक केसरकर म्हणाले, “मी २०१८ रोजी अर्थ राज्यमंत्री असताना हा प्रकल्प महाराष्ट्रात आणला होता. दुर्दैवाने २०१९ मध्ये महाराष्ट्राला असे पर्यटन मंत्री मिळाले, ज्यांना पर्यटन म्हणजे काय हे माहीत नव्हतं. त्यांच्या काळात हा प्रकल्प रखडला. अनेक वेळा त्यांच्याशी चर्चा केली. ते म्हणायचे, ‘पाणबुडी प्रकल्प आहे, ती पाण्यात बुडाली तर काय?’, अशी त्यांच्या मनात शंका होती. मुळात पाणबुडी पाण्यात बुडण्यासाठी म्हणजे खोलवर जाण्यासाठी असते, हे त्यांना माहीत नसावे” केसरकर म्हणाले, “सिंधुदुर्गात असलेले समुद्री विश्व किंवा ज्याला प्रवाळ म्हणतात. हे इतर कुठेही इतकं चांगलं नाही. त्यामुळे पाणबुडी प्रकल्प सिंधुदुर्गातच होईल. आपला प्रकल्प पाहून केरळ आणि गुजरातने अशाच पाणबुडी बूक केल्या आहेत. प्रत्येक राज्याला आपल्या राज्यात काही ना काही उपक्रम राबवायचे असतात, याचा अर्थ प्रकल्प हातातून गेला, असं होत नाही. एका बाजूला हा प्रकल्प महाराष्ट्रातच राहील असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत असले तरी दुसऱ्या बाजूला हा प्रकल्प द्वारकेला (गुजरात) जाणार असल्याच्या चर्चा वाढू लागल्या आहेत. द्वारकेला हिंदू पौराणिक कथांमध्ये खूप महत्त्व आहे. कारण ते भगवान श्रीकृष्णाने निर्माण केल्याचा उल्लेख पुराणांमध्ये आहे. त्यामुळे पाणबुडी प्रकल्प द्वारकेला नेण्याची योजना असल्याचं बोललं जात आहे. १० जानेवारी २०२४ पासून गुजरातची राजधानी गांधीनगर येथे होणाऱ्या व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिटमध्ये पाणबुडी पर्यटन प्रकल्पाबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारने २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्रातील विविध भागाच्या पर्यटन विकासासाठी १ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणार असल्याची घोषणा केली होती. यांतर्गत सिंधुदुर्गात देशातील पहिली पाणबुडी उपलब्ध करून देण्यात येणार होती.



### इतरही मोठे प्रकल्प सुरू

सिंधुदुर्गातील वेंगुर्ले तालुक्यातील निवती रॉक येथे समुद्रविश्व पाहण्यासाठी हा प्रकल्प राज्य सरकार राबवणार होतं. हा प्रकल्प आता गुजरातच्या द्वारका येथे होणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. टाईम्स ऑफ इंडियाने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं होतं. हा प्रकल्प गुजरातला नेण्यासाठी गुजरात सरकारने माझगाव डॉक लिमिटेडशी करार केल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प गुजरातला गेल्याची चर्चा सुरू झाली आहे. यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कोणीही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका. माझ्याबरोबर इथे दीपक केसरकर आहेत. मी सकाळी मंत्री उदय सामंत यांच्याशीदेखील चर्चा केली आहे. हा प्रकल्प आपल्या राज्याचा आहे, जो आपल्या राज्यातून बाहेर जाणार नाही, याची तुम्ही खात्री बाळगा. यासह आपल्या राज्यात इतरही मोठे प्रकल्प सुरू होत आहेत. एमटीएचएल प्रकल्पाचं येत्या १२ जानेवारीला उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या २२ किलोमीटर लांबीच्या सिंगल लॉंगेस्ट ब्रीजचं (सर्वात लांब पूल) उद्घाटन होणार आहे.

# प्रयोगशाळांमध्ये डीएनए चाचण्यांसाठी किट्स नाहीत

## हायप्रोफाईल आरोपींच्या मदतीसाठी: ठाकरे गटाचा गंभीर आरोप

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारच्या गृह विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये डीएनए चाचण्यांसाठी लागणारे किट्स उपलब्ध नसल्याचा दावा करत शिवसेनेच्या ठाकरे गटाने राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. अनेक गुन्ह्यांच्या प्रकरणात डीएनए चाचण्यांचे अहवाल गुन्हा सिद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु, काही हायप्रोफाईल खटल्यांमधील लोकांची अप्रत्यक्ष मदत करण्यासाठी हा किट्सचा तुटवडा निर्माण केला.**

असल्याचा आरोप शिवसेच्या ठाकरे गटाने केला आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी याप्रकरणी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. हे पत्र राऊत यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवरही शेअर केलं आहे. या पत्रात खासदार संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हटले आहे की, एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधत आहे. न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय ही महाराष्ट्र राज्याच्या गृहविभागाच्या अखत्यारित असलेली संस्था न्यायदानाच्या प्रक्रियेत एक महत्त्वाची भूमिका बजावत असते. या प्रयोगशाळेतील डीएनएचा अहवाल हा विवादित पितृत्व चाचणी, खून, बलात्कार, पोक्सो (POCSO) कायदा इत्यादींमध्ये महत्त्वाचा पुरावा म्हणून न्यायालयात ग्राह्य धरला जातो. परंतु, एप्रिल २०२३ पासून डीएनए तपासणीसाठी लागणारे किट्स बहुतेक कुठल्याच प्रयोगशाळेत उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे, अशी माझी माहिती आहे. संजय राऊत यांनी म्हटलं आहे की, काही गंभीर तसेच संवेदनशील गुन्ह्यांतील हायप्रोफाईल आरोपींना अप्रत्यक्ष मदत व्हावी म्हणून हा तुटवडा निर्माण करणे आणि त्यातून पुरावे नष्ट करण्याची ही योजना असल्याचे बोलले जाते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. परिणामी अनेक गुन्ह्यांच्या तपासामध्ये विलंब होत आहे. तपासामध्ये जप्त केलेला मुद्देमाल खराब होऊन त्यांचा गुन्हा सिद्धतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. या संचालनालयाला पूर्णवेळ महासंचालक, न्यायिक आणि तांत्रिक प्रमुख तसेच संचालक असूनदेखील या गंभीर विषयाकडे लक्ष नसल्याचे दिसून येते. तरी कृपया या तक्रारीची दखल घेऊन यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी.



### डीएनएचा अहवाल विवादित

देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हटले आहे की, एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधत आहे. वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय ही महाराष्ट्र राज्याच्या गृहविभागाच्या अखत्यारित असलेली संस्था न्यायदानाच्या प्रक्रियेत एक महत्त्वाची भूमिका बजावत असते. डीएनएचा अहवाल हा विवादित पितृत्व चाचणी, खून, बलात्कार, पोक्सो कायदा इत्यादींमध्ये महत्त्वाचा पुरावा म्हणून न्यायालयात ग्राह्य धरला जातो.

# बिहारमध्ये कोरोनामुळे 10 वर्षाच्या मुलीचा मृत्यू

## बिहारमध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिहारमधील (BIHAR) सासाराममध्ये कोरोना पॉझिटिव्ह (CORONA POSITIVE) असलेल्या 10 वर्षीय मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सासारामचे सिव्हिल सर्जन डॉ. केएन तिवारी यांनी मुलीच्या मृत्यूविषयी माहिती दिली. बिहारमधील लिलारी, नोखा येथे राहणारी ही मुलगी होती. या मुलीवर देहरीच्या जमुहर येथील नारायण मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला.या घटनेमुळे आरोग्यविभागात एकच खळबळ माजल्याचं पाहायला मिळालं.**

कोरोनाची चाचणी करण्यासाठी नमुना पाटण्याला पाठवण्यात आला सिव्हिल सर्जनने सांगितले की, मुलगी गयाच्या शेरघाटी येथे एका नातेवाईकाला भेटायला गेली होती. तिथेच तिची तब्येत बिघडू लागली आणि त्यानंतर तिला जमुहरच्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी तपासणी केली असता तिचा कोरोनाचा अहवाल हा पॉझिटिव्ह आला. डॉक्टरांनी तात्काळ तिच्यावर उपचार केले परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पण कोरोनाच्या कोणत्या व्हेरियंटमुळे तिचा मृत्यू झाला याची चाचणी करण्यासाठी नमुना पाटणा येथे पाठवण्यात आलाय.या नमुन्याचे निकाल आल्यानंतर तिच्या मृत्यूबाबत खुलासा करण्यात येईल. ही मुलगी ज्या गावात राहणार होती तेथे वैद्यकीय पथक पाठवण्यात आले असल्याची माहिती देखील यावेळी आरोग्य विभागाने दिली. तसेच त्या गावामध्ये कोविड चाचणी देखील घेण्यात आलीये. परंतु इतर कोणीही कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले नसल्याचं सांगण्यात आलं आहे. संपूर्ण खबरदारी घेतली जात असून आरोग्य विभाग पूर्णपणे सतर्क झाले असल्याची माहिती देण्यात आलीये. भारतात सध्या कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून देशामध्ये मागील



24 तासांमध्ये कोविड-19 चे 841 नवीन रुग्ण आढळून आले आहेत. तसेच रविवार 31 डिसेंबर रोजी एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ही 4,309 इतकी झाली आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. राज्यात मागील काही दिवसांपासून कोरोनाबाधितांच्या संख्येत (CORONAVIRUS CASES) वाढ होत आहे. आजही रविवारी, 31 डिसेंबर रोजी राज्यात 131 नवीन कोरोनाबाधित (CORONAVIRUS INFECTED) आढळले आहेत. त्यामुळे आता राज्यात सक्रिय कोरोनाबाधितांचा आकडा 701 वर पोहचला आहे. तर, कोरोनाचा नवा व्हेरिएंट जेएन.1 (CORONAVIRUS JN.1 INFECTION) बाधितांच्या संख्येत वाढ झाली आहे. या व्हेरिएंटचे 29 रुग्ण झाले आहेत. कोरोनाची चाचणी करण्यासाठी नमुना पाटण्याला पाठवण्यात आला सिव्हिल सर्जनने सांगितले की, मुलगी गयाच्या शेरघाटी येथे एका नातेवाईकाला भेटायला गेली होती. तिथेच तिची तब्येत बिघडू लागली आणि त्यानंतर तिला जमुहरच्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी तपासणी केली असता तिचा कोरोनाचा अहवाल हा पॉझिटिव्ह आला. डॉक्टरांनी तात्काळ तिच्यावर उपचार केले परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पण कोरोनाच्या कोणत्या व्हेरियंटमुळे तिचा मृत्यू झाला याची चाचणी करण्यासाठी नमुना पाटणा येथे पाठवण्यात आलाय.या नमुन्याचे निकाल आल्यानंतर तिच्या मृत्यूबाबत खुलासा करण्यात येईल. ही मुलगी ज्या गावात राहणार होती तेथे वैद्यकीय पथक पाठवण्यात आले असल्याची माहिती देखील यावेळी आरोग्य विभागाने दिली. तसेच त्या गावामध्ये कोविड चाचणी देखील घेण्यात आलीये. परंतु इतर कोणीही कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले नसल्याचं सांगण्यात आलं आहे. संपूर्ण खबरदारी घेतली जात असून आरोग्य विभाग पूर्णपणे सतर्क झाले असल्याची माहिती देण्यात आलीये. भारतात सध्या कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून देशामध्ये मागील 24 तासांमध्ये कोविड-19 चे 841 नवीन रुग्ण आढळून आले आहेत.

### अहवाल हा पॉझिटिव्ह आला

» तसेच रविवार 31 डिसेंबर रोजी एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ही 4,309 इतकी झाली आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. कोरोनाची चाचणी करण्यासाठी नमुना पाटण्याला पाठवण्यात आला सिव्हिल सर्जनने सांगितले की, मुलगी गयाच्या शेरघाटी येथे एका नातेवाईकाला भेटायला गेली होती. तिथेच तिची तब्येत बिघडू लागली आणि त्यानंतर तिला जमुहरच्या वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी तपासणी केली असता तिचा कोरोनाचा अहवाल हा पॉझिटिव्ह आला. डॉक्टरांनी तात्काळ तिच्यावर उपचार केले परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पण कोरोनाच्या कोणत्या व्हेरियंटमुळे तिचा मृत्यू झाला याची चाचणी करण्यासाठी नमुना पाटणा येथे पाठवण्यात आलाय. या नमुन्याचे निकाल आल्यानंतर तिच्या मृत्यूबाबत खुलासा करण्यात येईल.

# कधी अस्मानी तर कधी सुलतानी

## सरत्या वर्षात शेतकऱ्यांना काय मिळालं?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**2023 वर्षाला निरोप देण्यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. सर्वजण नवीन वर्ष 2024 च्या स्वागतासाठी सज्ज झाले आहेत. पण त्याआधी यावर्षी शेती क्षेत्राशी निगडीत अनेक घटना घडल्या आहेत. पाहुयात शेती क्षेत्रात घडलेल्या घटनांचा सविस्तर आढावा.**



2023 हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणून घोषीत करण्यात आले होते. भारताचे भरडधान्य जगभरात चर्चेचा विषय ठरला. शेतीच्या जगात इतरही अनेक मोठे टप्पे आहेत. 5 राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनीही हे टप्पे थांबवल. बाजरी पिकवण्याबाबत आणि खाण्याबाबत लोकांमध्ये जशी जागरूकता दिसून येते तशी यापूर्वी कधीही झाली नव्हती. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी पुन्हा बाजरी पिकवण्यास सुरुवात केली. मिलेट्समध्येही अनेक नवीन स्टार्टअप्स आले. वर्ष संपत आले असून बाजरीबाबत चर्चा सुरू आहे. या वर्षाची सुरुवातही शेतीच्या जगात बाजरी क्रांतीने झाली आहे. 2023 हे वर्ष जगभरात बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. सरकारचे संपूर्ण लक्ष देशाच्या कानाकोपऱ्यात बाजरीच्या संदर्भात जनजागृती मोहीम राबवणे आणि लोकांना त्याबद्दल बरीच माहिती देणे हे होते. बाजरीपासून बनवलेल्या उत्पादनांवरील जीएसटी 18 टक्क्यांऐवजी 5 टक्के करण्यात आला. त्याचबरोबर अनेक प्रसंगी खुद्द पंतप्रधान मोदीही मंचावरून बाजरीच्या फायद्यांविषयी बोलताना दिसले. यावर्षी झालेल्या G-20 परिषदेत परदेशी पाहुण्यांना बाजरीचे पदार्थही देण्यात आले.

यासोबतच बाजरी मिशन अंतर्गत देशभरात बाजरीची लागवड आणि वापरास प्रोत्साहन दिले जात आहे. राज्य सरकारेही भरड धान्याला प्रोत्साहन देत आहेत. अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांना भरड धान्याचे बियाणेही मोफत दिले जात आहे. शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात कर्ज देण्यासाठी आणि निधीच्या समस्येवर मात करण्यासाठी "किसान कर्ज पोर्टल" देखील यावर्षी सुरू करण्यात आले. हे पोर्टल शेतकऱ्यांना डेटा, कर्ज वितरणाची माहिती, व्याज अनुदान आणि योजनेबद्दल अधिक माहिती प्रदान करते. किसान क्रेडिट कार्डद्वारे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची माहिती आता किसान कर्ज पोर्टलवर सहज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्यांची सोय होणार आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी.

# आता युद्ध सर्वोच्च बिंदूवर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

गेल्या जवळपास तीन महिन्यांपासून इस्रायल व हमास यांच्यात चालू असलेल्या युद्धाला अद्याप पूर्णविराम लागलेला नसून इस्रायलनं सातत्याने गाझा पट्टीतील हमासच्या तळांवर हल्ले चालूच ठेवले आहेत. गेल्या अडीच महिन्यांत या युद्धात इस्रायलचे १२०० नागरिक व सैनिक मारले गेले. प्रत्युत्तरात इस्रायलनं केलेल्या हल्ल्यात आत्तापर्यंत २१ हजारहून जास्त पॅलेस्टिनी नागरिक मारले गेल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे युद्धाबाबत जागतिक पातळीवर चिंतेचं वातावरण असताना आता बेंजामिन नेतान्याहू यांनी केलेल्या सूचक विधानामुळे ही चिंता अधिकच वाढली आहे. शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गाझा पट्टीतील हमासवरच्या हल्ल्यांबाबत भूमिका मांडली. "आता युद्ध सर्वोच्च बिंदूवर पोहोचलं आहे" असं नेतान्याहू म्हणाले. त्याशिवाय इजिप्त आणि गाझापट्टीदरम्यानचा फिलाडेल्फिया कॉरिडॉर इस्रायलयच्या ताब्यात असायला हवा, त्यामुळे जवळपास संपूर्ण गाझापट्टीत हल्ले केल्यानंतर आता दोन्ही देशांच्या सीमाभागातील हा पूर्ण पट्टा आपल्या ताब्यात घेण्याच्या दिशेनं इस्रायलच्या सैन्यानं आगेकूच केल्याचं दिसून येत आहे. "हा कॉरिडॉर पूर्णपणे बंद व्हायला हवा. त्याशिवाय आपल्याला या भागात अपेक्षित असलेलं निर्लष्करीकरण साध्य होणं अशक्य आहे", असंही नेतान्याहू यावेळी म्हणाले. २००५ साली झालेल्या करानानुसार इस्रायलयनं गाझा पट्टीतून आपलं सैन्य माघारी घेतलं होतं. तेव्हापासून या भागात हमासचं वर्चस्व राहिलं आहे. मात्र, आता इस्रायलनं पूर्ण गाझा पट्टीतून हमासला हद्दपार करण्याची भाषा सुरू केल्यामुळे हे थेट २००५ च्या कराराचं उल्लंघन ठरेल.

# पुन्हा संसार थाटणार मलायका अरोरा !



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. मलायका ही गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अर्जुन कपूरला (ARJUN KAPOOR) डेट करत आहे. अशातच मलायकाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ज्या व्हिडीओमध्ये मलायका ही अर्जुनसोबत नाही तर दुसऱ्या अभिनेत्यासोबत रोमँटिक डान्स करताना दिसत आहे. मलायका ही झलक दिखला जा या कार्यक्रमाची परीक्षक आहे. काही दिवसांपूर्वी झलक दिखला जा या कार्यक्रमाच्या मंचावर अभिनेता शोएब इब्राहिम आणि मलायका यांचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना बघायला मिळाला. शोएब आणि मलायका यांनी झलक दिखला जा या कार्यक्रमात रोमँटिक गाण्यावर डान्स केला. तसेच शोएबनं मलायकाच्या हातावर किस देखील केलं. दोघांच्या या रोमान्सनं अनेकांचे लक्ष वेधलं. 'झलक दिखला जा 11' या कार्यक्रमामध्ये फराह खाननं मलायकाला विचारलं,"2024 मध्ये तू अभिनेत्री आणि सिंगल पॅरेंट असणार की, अभिनेत्री आणि डबल पॅरेंट असणार?" फराहच्या या प्रश्नाला मलायका उत्तर देते, " त्यासाठी मला पुन्हा कोणालातरी दत्तक घ्यावे लागेल" तर गौहर खान मलायकाला म्हणते,"तू दुसरं लग्न करणार आहेस का?". यावर मलायका म्हणते, "एखादी चांगली व्यक्ती असेल तर नक्कीच मी 100 टक्के लग्न करण्याचा विचार करेल. मला कोणी लग्नसाठी मागणी घातली तर मी पुन्हा संसार थाटेल" 'छैय्या छैय्या', मुन्नी बदनाम हुई डार्लिंग तेरे लिए या गाण्यांमुळे मलायकाला विशेष लोकप्रियता मिळाली.मलायकाने 1998 मध्ये अरबाजसोबत लग्न केले. त्यानंतर 2017 मध्ये मलायका आणि अरबाजचा घटस्फोट झाला. मलायका आणि अरबाज यांना एक मुलगा आहे. त्याचे नाव अरहान खान आहे. काही दिवसांपूर्वी अरबाजनं शूरा खानसोबत लग्न केलं. तर मलायका ही अर्जुनसोबत कधी लग्न करणार? असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला आहे.बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. मलायका ही गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अर्जुन कपूरला (ARJUN KAPOOR) डेट करत आहे.

## सालार पुढे फिका पडला किंग खानचा 'डंकी

गेल्या काही दिवसांपासून बिग बजेट चित्रपटांची बॉक्स ऑफिसवर टक्कर होत आहे. अशातच प्रेक्षकांच्या 2023 या वर्षाचा शेवट मनोरंजनात्मक करण्यासाठी प्रभासचा (PRABHAS) सालार आणि शाहरुख खानचा डंकी हे दोन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. डंकी हा चित्रपट सालार या चित्रपटाच्या एक दिवस आधी रिलीज झाला. पण तरी देखील सालार या चित्रपटापेक्षा डंकी हा चित्रपट जास्त कमाई करत आहे. जाणून घेऊयात डंकी आणि सालार या चित्रपटांचं बॉक्स ऑफिस कलेक्शन... सालार' या चित्रपटाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळत आहे. या चित्रपटातील ॲक्शन सीन्सला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. SACNILK च्या अर्ली रिपोर्टनुसार, सालार या चित्रपटानं रिलीजच्या आठव्या दिवशी म्हणजेच सेकंड फ्रायडेला जवळपास 10 कोटींची कमाई केली आहे.

## मुलांवर संस्कार होण्यासाठी



बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं नेहमीच चाहत्यांच्या पसंतीची अभिनेत्री राहिलेल्या प्रियंका चोप्रानं हॉलीवूडमध्ये देखील दमदारपणे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हॉलीवूडमध्ये तिच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. सध्या विदेशात स्थायिक असणाऱ्या प्रियंकाच्या आईनं कुटूंब पद्धतीवर केलेले भाष्य चर्चेत आले आहे. प्रियंका ही अमेरिकेमध्ये तिचा पती निक जोनास याच्यासोबत राहते आहे.तिला मालती नावाची मुलगी आहे. २०१८ मध्ये तिनं निकसोबत लग्न केले होते. गेल्या काही दिवसांपासून प्रियंका आणि तिचा पती निक हे वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहे. हॉलीवूडमधील प्रतिष्ठेच्या ऑस्कर सोहळ्यामध्ये सहभागी होण्याची संधी हा दोन्ही सेलिब्रेटींना मिळाली होती. त्याची बॉलीवूडमध्ये चर्चा झाली होती. प्रियंका चोप्राची आई मधू चोप्रा यांनी सध्या एकत्र आणि विभक्त कुटूंब पद्धतीवर केलेलं भाष्य हे नेटकऱ्यांच्या चर्चेत आले आहे. डॉक्टर मधू चोप्रा या सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या सेलिब्रेटी आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी प्रियंका चोप्राचे लहानपण आणि विभक्त कुटूंब पद्धती, त्याचा मुलांवर होणारा परिणाम, संस्कार यावर मोकळेपणानं प्रतिक्रिया दिली होती.

## 'सूर नवा ध्यास : पर्वाचा महागायक ठरला गावंडे

कलर्स मराठीवरील 'सूर नवा ध्यास नवा - आवाज तरुणाईचा' या मालिकेच्या सहाव्या पर्वाचा GRAND FINALE दिमाखात पार पडला. 'आवाज तरुणाईचा' या पर्वात अकोल्याचा गोपाळ गावंडे विजेता ठरला आहे. या पर्वामध्ये गोपाळने उत्कृष्ट सादरीकरण करत अपवादात्मक कामगिरी केली. स्पर्धेतील त्याच्या उल्लेखनीय प्रवासामुळे तो या पर्वाचा 'महागायक' ठरला आहे. या पर्वात जुनी गाणी नव्या अंदाजात ऐकायला मिळाली. या प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. गोपाळ गावंडे याचा अतुलनीय आत्मविश्वास आणि संपूर्ण पर्वातील अपवादात्मक कामगिरीमुळे आणि प्रेक्षकांच्या प्रचंड पाठिंब्यामुळे त्याला राजगायकाचा मान मिळाला. सूर नवा ध्यास नवा - आवाज तरुणाईचा' हे पर्व संगीतातील वैविध्य आणि प्रतिभेची समृद्धता साजरं करणारं व्यासपीठ आहे. गोपाळ गावंडेचा विजय त्याचं समर्पण, उल्लेखनीय कामगिरी आणि प्रेक्षकांच्या प्रचंड पाठिंब्यामुळे शक्य झाला. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या स्पर्धकांनी त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीने प्रेक्षकांना भुरळ घातली, त्यामुळे खरोखरच हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला आहे. या पर्वामध्ये गोपाळने उत्कृष्ट सादरीकरण करत अपवादात्मक कामगिरी केली. स्पर्धेतील त्याच्या उल्लेखनीय प्रवासामुळे तो या पर्वाचा 'महागायक' ठरला आहे. या पर्वात जुनी गाणी नव्या अंदाजात ऐकायला मिळाली. या प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. गोपाळ गावंडे याचा अतुलनीय आत्मविश्वास आणि संपूर्ण पर्वातील अपवादात्मक कामगिरीमुळे आणि प्रेक्षकांच्या प्रचंड पाठिंब्यामुळे त्याला राजगायकाचा मान मिळाला.

## माधुरी दीक्षितने सांगितला 'पंचक'चा अनुभव



डॉ. श्रीराम नेने आणि माधुरी दीक्षित नेने निर्मित 'पंचक' हा चित्रपट प्रदर्शित व्हायला अवघे काही दिवस असतानाच आता या चित्रपटाचा आणखी एक उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. इतकेच नाही तर बॉलिवूडमधील काही नामवंत कलाकारांनी 'पंचक'च्या ट्रेलरचे भरभरून कौतुक केले आहे. नवीन वर्षात प्रदर्शित होणारा हा चित्रपट मल्टीस्टारर आहे. अशातच चित्रपटाचा नवीन ट्रेलर भेटीला आलाय. 'पंचक'च्या पहिल्या ट्रेलरने खूप उत्सुकता निर्माण केली होती. त्यात आता या दुसऱ्या ट्रेलरने अधिक भर टाकली आहे. खोतांच्या घराला पंचक लागल्याने 'आता कोणाचा नंबर ?' हा प्रश्न अवघ्या घराला पडलेला असतानाच, अनेक जण आपापल्या परीने हे संकट टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. या सगळ्या गोंधळात घरात सर्कस होत आहे, ऑपेराही होताना दिसत आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार हे, याचे उत्तर प्रेक्षकांना ५ जानेवारी रोजी मिळणार आहे. कथा, दिग्दर्शन, कलाकार, संगीत या सगळ्याच चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. चित्रपटाबद्दल माधुरी दीक्षित नेने म्हणतात, "या चित्रपटाच्या क्रिएटिव्ह बाबींमध्ये मी विशेष लक्ष घातले आहे. पडद्यावरील आणि पडद्यामागील प्रत्येकाची निवड ही योग्य आहे. चित्रपट पाहताना याचा प्रत्यय प्रेक्षकांनाही नक्कीच येईल. प्रत्येक कलाकार त्या व्यक्तिरेखेत चपखल बसला आहे. चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान थोड्या अडचणी आल्या परंतु आज

# तिसऱ्या कसोटीआधी पाकिस्तानला धक्का!

## » 'हा' डावखुरा फलंदाज दुखापतीमुळे होऊ शकतो बाहेर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान यांच्यातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना ३ जानेवारीपासून खेळवला जाणार आहे. दोन्ही संघ सिडनीत आमनेसामने येणार आहेत. पहिले दोन कसोटी सामने गमावल्यानंतर पाकिस्तान संघाने मालिका गमावली आहे. शेवटचा सामना जिंकून मायदेशी परतण्याचे त्याचे लक्ष्य असेल. त्याचवेळी ऑस्ट्रेलियाचा आपला दिग्गज सलामीवीर डेव्हिड वॉर्नरला विजयासह अलविदा करण्याचा विचार असेल. वॉर्नरची ही शेवटची कसोटी असेल. त्याने आधीच निवृत्ती जाहीर केली होती.**



पाकिस्तानला तिसऱ्या कसोटीत २१ वर्षीय अनकॅप्ड सलामीवीर सॅम अयुबला मैदानात उतरवण्याची अपेक्षा आहे. अनुभवी सलामीवीर इमाम-उल-हक दुखापतीमुळे वगळला जाऊ शकतो. अखेर संघ व्यवस्थापनाने अयुबला संधी देण्याचा निर्णय घेतला असल्याची चर्चा पाकिस्तान क्रिकेट वर्तुळात आहे. या युवा डावखुऱ्या फलंदाजाने यावर्षी आठ टी-२० सामने खेळले आहेत. तो कसोटी क्रिकेटमधील तज्ञ मानला जातो. मात्र, त्याने केवळ १४ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. चार दिवसांत संपलेल्या पहिल्या दोन कसोटीत पाकिस्तानची फलंदाजी अडचणीत आली होती, त्यामुळे संघ व्यवस्थापन अयुबबरोबर जोखीम पत्करण्यास तयार होते. कराचीच्या या युवा खेळाडूने गेल्या वर्षी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने आपल्या शॉटस् आणि सकारात्मक वृत्तीने सर्वांना प्रभावित केले आहे. पाकिस्तानही मिस्ट्री स्पिनर अबरार अहमदच्या फिटनेसची आतुरतेने वाट पाहत आहे. दुखापतीमुळे तो पहिल्या दोन कसोटीत खेळू शकला नाही. सिडनी कसोटीसाठी अबरार वेळेत तंदुरुस्त न झाल्यास पाकिस्तान ऑफस्पिनर साजिद खानला संधी देईल, असे संकेत आहेत. अबरारच्या दुखापतीनंतर त्याचा संघात समावेश करण्यात आला होता. दुसरीकडे तिसऱ्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाने आपला संघ जाहीर केला आहे. पर्थमधील पहिली कसोटी आणि मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटी जिंकून ऑस्ट्रेलियाने मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. मुख्य निवडकर्ता जॉर्ज बेली म्हणाले, "सिडनी कसोटीसाठीही हाच संघ कायम ठेवण्यात आला आहे. आम्हाला कसोटी मालिकेत निर्भेळ यश मिळवायचे आहे. डेव्हिड वॉर्नरचा शेवटचा कसोटी सामना आणि त्याच्या घरच्या मैदानावर त्याची अविश्वसनीय कारकीर्द साजरी करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत." ३८ धावा करूनही वॉर्नरने एक खास विक्रम आपल्या नावावर केला. तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वाधिक धावा करणारा दुसरा खेळाडू ठरला. वॉर्नरने स्टीव्ह वॉला मागे टाकले आहे. स्टीव्ह वॉने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८,४९६ धावा केल्या होत्या. त्याचवेळी वॉर्नर आता स्टीव्ह वॉच्याही पुढे गेला आहे. वॉर्नरच्या नावावर सध्या तिन्ही फॉरमॅटसह १८,५०२ धावा आहेत. ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूंमध्ये तो आता फक्त रिकी पाँटिंगच्या मागे आहे. पाँटिंगने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण २७,३६८ धावा केल्या होत्या. सिडनी कसोटीसाठी ऑस्ट्रेलियन संघ: पॅट कमिन्स (कर्णधार), स्कॉट बोलँड, अॅलेक्स कॅरी, कॅमेरॉन ग्रीन, जोश हेझलवूड, ट्रॅविस हेड, उस्मान ख्वाजा, मार्नस लाबुशेन, नॅथन लायन, मिचेल मार्श, स्टीव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क, डेव्हिड वॉर्नर. पाकिस्तानला तिसऱ्या कसोटीत २१ वर्षीय अनकॅप्ड सलामीवीर सॅम अयुबला मैदानात उतरवण्याची अपेक्षा आहे. अनुभवी सलामीवीर इमाम-उल-हक दुखापतीमुळे वगळला जाऊ शकतो. अखेर संघ व्यवस्थापनाने अयुबला संधी देण्याचा निर्णय घेतला असल्याची चर्चा पाकिस्तान क्रिकेट वर्तुळात आहे. या युवा डावखुऱ्या फलंदाजाने यावर्षी आठ टी-२० सामने खेळले आहेत. तो कसोटी क्रिकेटमधील तज्ञ मानला जातो. मात्र, त्याने केवळ १४ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. चार दिवसांत संपलेल्या पहिल्या दोन कसोटीत पाकिस्तानची फलंदाजी अडचणीत आली होती, त्यामुळे संघ व्यवस्थापन अयुबबरोबर जोखीम पत्करण्यास तयार होते. कराचीच्या या युवा खेळाडूने गेल्या वर्षी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने आपल्या शॉटस् आणि सकारात्मक वृत्तीने सर्वांना प्रभावित केले आहे

### दोन्ही संघ सिडनीत आमनेसामने

» . पाकिस्तानही मिस्ट्री स्पिनर अबरार अहमदच्या फिटनेसची आतुरतेने वाट पाहत आहे. दुखापतीमुळे तो पहिल्या दोन कसोटीत खेळू शकला नाही. सिडनी कसोटीसाठी अबरार वेळेत तंदुरुस्त न झाल्यास पाकिस्तान ऑफस्पिनर साजिद खानला संधी देईल, असे संकेत आहेत. अबरारच्या दुखापतीनंतर त्याचा संघात समावेश करण्यात आला होता. दुसरीकडे तिसऱ्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियाने आपला संघ जाहीर केला आहे. पर्थमधील पहिली कसोटी आणि मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटी जिंकून ऑस्ट्रेलियाने मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. मुख्य निवडकर्ता जॉर्ज बेली म्हणाले, "सिडनी कसोटीसाठीही हाच संघ कायम ठेवण्यात आला आहे. आम्हाला कसोटी मालिकेत निर्भेळ यश मिळवायचे आहे. डेव्हिड वॉर्नरचा शेवटचा कसोटी सामना आणि त्याच्या घरच्या मैदानावर त्याची अविश्वसनीय कारकीर्द साजरी करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत." ३८ धावा करूनही वॉर्नरने एक खास विक्रम आपल्या नावावर केला.

# भारताच्या विजयात कोणता संघ अडथळा ठरेल?

## » टी-20 विश्वचषक: गौतम गंभीरने केले सूचक वक्तव्य

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**२००७च्या टी-२०विश्वचषक स्पर्धेत भारताच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या गौतम गंभीरने आगामी टी-२० विश्वचषक २०२४मध्ये टीम इंडियासाठी सर्वात त्रासदायक संघाची भविष्यवाणी केली आहे. त्याच्यामते हा संघ टीम इंडियाला पराभूत करू शकतो. कोणता असा दुबळा संघ आहे जो भारतासाठी मोठा अपसेट ठरू शकतोस? जाणून घेऊ या.**







एकदिवसीय विश्वचषक २०२३च्या अंतिम फेरीतील पराभवामुळे निराश झालेली टीम इंडिया नव्या आव्हानासाठी सज्ज होत आहे. टीम इंडियाला जूनमध्ये वेस्ट इंडिज आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) येथे २०२४ मध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत, त्यांचा आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याची चांगली संधी आहे. मात्र, गौतम गंभीरच्या मते अफगाणिस्तान टीम इंडियाच्या मार्गात अडथळे निर्माण करू शकतो. 'थम्सअप' ने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलवर प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओमध्ये, गंभीर, त्याचा माजी सहकारी युवराज सिंगसह, या स्पर्धेतील आवडत्या आणि स्पर्धेतील भारतीय संघासाठी असलेल्या प्रमुख धोक्यांवर चर्चा केली. गंभीरच्या मते, अफगाणिस्तान एक आश्चर्यकारक पॅकेज म्हणून उदयास आला आणि त्या संघात भारताला आव्हान देण्याची क्षमता आहे, विशेषत: टी-२० विश्वचषकाच्या या परिस्थितीत. याव्यतिरिक्त, त्याने ५० षटकांचे विश्वविजेते आणि २०२१ टी-२० विश्वचषक विजेते ऑस्ट्रेलियाकडे लक्ष वेधले जे भारतासमोर महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण करू शकतात. गंभीर म्हणाला, "टी-२० विश्वचषकातील भारतासाठी सर्वात मोठा धोका अफगाणिस्तान आहे, अशा परिस्थितीत खूप त्यांना कमी लेखून चालणार नाही. ते कोणालाही अपसेट करू शकतात. विश्वचषक २०२३ एकदिवसीय विश्वचषकात त्यांनी जबरदस्त कामगिरी करून मोठमोठ्या संघाना बाहेर काढले होते. दूसरा संघ ऑस्ट्रेलिया कारण, त्यांच्याकडे प्रभावी खेळाडू आहेत. तिसरा संघ म्हणजे इंग्लंड कारण, ते टी-२० क्रिकेट जसे खेळले पाहिजे तसेच खेळतात. त्यामुळे भारताला एवढ्या सहज विश्वचषक जिंकता येणे अवघड आहे."

### आफ्रिका टी-20 विश्वचषक जिंकेल

» दुसरीकडे, आपले मत मांडताना युवराज सिंग म्हणला की, "माझी विचार करण्याची पद्धत थोडी वेगळी आहे. मला वाटते की दक्षिण आफ्रिका टी-२० विश्वचषक जिंकेल. या संघाने टी-२० किंवा एकदिवसीय अशी एकही स्पर्धा जिंकलेली नाही. वन डे वर्ल्डकपमध्ये ज्या प्रकारे प्रगती केली आहे.